# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/11/2022 (बुधवार) दुपार

---

### फसवणुक

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत जिजाऊ कॉम्प्लेक्स, कळमेश्वर येथे दिनांक ३०/०३/२०२२ ते दिनांक १०/०६/२०२२ वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनोज कृष्णाजी बागडे, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र ०६, प्लॉट न. ३२ कळमेश्वर यास 'गिगल रिटेल रिसोर्स प्रायव्हेट लिमीटेड' या कंपनाची फ्रेंचायजी मिळण्याकरीता कंपनीचे प्रतिनीधी आरोपी नामे– १) अभिषेक भोंडे, वय ३६ वर्ष, रा. गौतमनगर कळमेश्वर, २) सागर रहांगडाले, रा. गोंदीया, ३) हेमंत ब्राम्हणकर, रा. गोंदीया, ४) कंपनीचे मालक सरबजितसींग सलुजा, रा. मुंबई ५) हींमतसिंग सोलंकी, रा. मुंबई यांनी १० लाख रुपये भरण्यास प्रोत्साहीत केले, त्याबद्दल कंपनी, फिर्यादीस शॉपी तयार करुन देणार, १० ते १५ लाख रुपयांचे इलेक्ट्रीक साहित्य कंपनी देणार होती. ०७ लाख रुपये एन. ई. एफ. टी. मार्फत नमुद कंपनीच्या आय. सी. आय. सी. आय. बँक बांगरनगर शाखा, मुंबई या खाते क्र. १०१९०५०००९७४ यावर पैसे दिल्यानंतर उरलेले ०३ लाख रुपये काम पुर्ण झाल्यानंतर त्यांनी भरण्यास सांगितले होते व त्यानंतरच करारपत्र करण्यात येईल असे सांगितले होते. गुंतवणुक केलेली रक्कम फसली तर सर्व जबाबदारी कंपनी घेणार असे आरोपीतांनी सांगितले होते. परंतु ठरल्याप्रमाणे त्यांनी कुठलेही काम करुन न दिल्याने, फिर्यादीने त्याचे दिलेले ०७ लाख रुपये परत मागितले असता, आरोपी सरबजितसिंग सलुजा, व हिंमतसींग सोलकी रा. मुंबई यांनी त्यांचे वकीलामार्फत फिर्यादीला पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक मेश्राम, मो. क्र. ९०७५२४५०५९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**